शासकीय सेवेत असताना दिवंगत, अकाली, सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या नातेवाईकांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:अकंपा-१०९८/प्र.क्र.५/९८/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १० , मार्च-१९९८.

वाचा:- १]शासन निर्णय,सा.प्र.वि.क्रमांक: अकंपा-१०९५/प्र.क्र.३९-अ/आठ, दि.२३ ऑगस्ट-१९९६.

२]शासन निर्णय,सा.प्र.वि.क्रमांक: अकंपा-१०९७/प्र.क्र.३२/आठ, दिनांक ८ सप्टेंबर-१९९७.

शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक: अकंपा-१०९५/प्र.क्र.३९/आठ, दिनांक २३ ऑगस्ट-१९९६ नुसार लिपिक-टंकलेखक पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिल्यानंतर टंकलेखनाचे विहित वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यास दोन वर्षांची मुदत देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे दोन वर्षांच्या मुदतीत टंकलेखनाचे प्रमाणपत्र प्राप्त न करणा-या उमेदवारांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येते. तथापि, मृत शासकीय कर्मचा-यांच्या विधवेच्या बाबतीत दोन वर्षात टंकलेखनाचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे कौटुंबिक जबाबदारीमुळे शक्य होत नाही. अशा वेळेस मुदतवाढ देण्याची विनंती संबंधित विधवेकडून करण्यात येते. तसे प्रस्ताव विविध विभागांकडून प्राप्त होतात. या संदर्भात सर्वसम्यक विचार करून आता असे आदेश देण्यात येत आहेत की, मृत शासकीय कर्मचा-याच्या विधवेच्या बाबतीत टंकलेखनाचे विहित वेगमर्यादेचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यास मूळ नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षानंतर एक वर्षाची मुदतवाढ खालील अटींच्या अधिनस्त देण्यात यावी,

अ] संबंधित कर्मचा-याने दोन वर्षात टंकलेखनाच्या परीक्षेसाठी उपलब्ध चार संधीपैकी किमान तीन संधींचा लाभ घेतलेला असणे आवश्यक आहे,

ब] उपरोक्त सवलत मृत शासकीय कर्मचा-याच्या केवळ विधवा कर्मचा-यास लागू राहील.कुठल्याही परिस्थितीत त्या पुढील कालावधीस मुदतवाढ मिळणार नाही.

क] तसेच ही सवलत वैधकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या पत्नीस देखील लागू राहील.

239
Rhc
23/3/98

ड] या वाढीव कालावधीत देखील टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण न होऊ शकणा-या कर्मचा-यांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात, तसा उल्लेख मुदतवाढीच्या आदेशातच करण्यात यावा.

२. वरील अटीत बसणा-या प्रस्तावांच्या बाबतीत अशी मुदत वाढ देण्याचे प्राधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना देण्यात येत आहेत. त्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे संदर्भ करण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[य. मा. जोशी]
सह सचिव, महाराष्ट्र शासन.